संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# न्यायालयाकडून सरकारला पुन्हा चपराक

**कोणताही** पूर्व विचार न करता निर्णय घेणे किंवा एखाद्या प्रकरणी कारवाई करणे या गोष्टी राज्यसरकारच्या वारंवार अंगाशी येऊ लागल्या आहेत. म्हणजेच अपुरी माहिती तसेच अपुऱ्या पुराव्यांवर निर्णय घेतले जातात किंवा पोलिसांकडून कारवाई केली जाते. मात्र अशा निर्णयांना किंवा कारवायांना न्यायालयात आव्हान दिल्यानंतर काय परिस्थिती असेल याचा विचारही सरकारतर्फे केला जात नाही. माओवाद्यांशी संबंध असल्याच्या कारणावरून पुण्यात अटक करण्यात आलेल्या डॉ. आनंद तेलतुंबडेंबाबत पुन्हा त्याचाच अनुभव आला. सत्र न्यायालयाने त्यांची अटक बेकायदा ठरवून सुटकेचे आदेश दिले. म्हणजेच पुणे पोलिसांनी केलेली कारवाई ही केवळ घिसडघाई होती हे त्यातून स्पष्ट झाले. महिन्याभरातच न्यायालयांकडून आपले तोंड फोडून घेण्याचा दुसरा प्रकार सरकारवर ओढवला. अर्थातच गेल्या वर्षभरात सलगपणाने असे अनेक प्रकार घडत आले. अलिकडेच डान्सबार बंदीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची कानउघाडणी केली होती आणि डान्सबार बंदीचा निर्णय अयोग्य ठरवून काही नव्या तरतूदींसह डान्सबार चालू करण्यास परवानगी देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. सर्व प्रकारचा सरकारी फौजफाटा असताना आणि एकेका कोर्ट केसेसवर लाखो रुपये खर्च होत असताना सरकारची बाजू न्यायालयामध्ये टिकून राहू नये ही कितीतरी मोठी नामुष्की ठरते. हे प्रकार सातत्याने होत असल्यामुळे सरकार त्याची गांभिर्याने दखल घेणार आहे की नाही, असा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. न्यायालयांकडून वारंवार चपराक बसूनही जर सुधारणा होत नसेल तर सरकारकडून केल्या जाणाऱ्या कारवाया किंवा निर्णय केवळ चुकीचे ठरत नाहीत. तर त्यात सूडबुध्दी असल्याचेच त्यातून सिध्द होते. म्हणूनच या गोष्टीचा सरकारने गांभिर्याने विचार केला पाहिजे. केवळ पोलिसांनी योग्य ती माहिती गोळा केली नाही किंवा पुरावे गोळा करायला ते असमर्थ ठरले. एवढाच त्याचा निष्कर्ष निघत नाही. संबंधित निर्णय किंवा कारवाईची दिशाच अयोग्य असल्याचे अशा प्रकारांमधून स्पष्ट होते. तेलतुंबडेंविषयीची सुनावणी पुण्याच्या सत्र न्यायालयातच होती. प्रथम दर्शनी स्थानिक पोलिसांकडे दोष जात असला तरी त्याचे दिशानिर्देश थेट मंत्रालयातूनच गृहविभागाकडून दिले गेले होते याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

## घिसडघाईचे परिणाम

सरकारची बाजू एवढी कमकुवत का राहावी किंवा सरकारवर वारंवार अशा नामुष्कीची वेळ का यावी याचा विचार केला तर एक निष्कर्ष ताबडतोब काढता येतो तो म्हणजे निर्णय घेतानाच किंवा कारवाई करताना त्याच्या परिणामांचा अंदाज घेतला जात नाही. म्हणजेच अपुरी तयारी आणि तरीही कारवाई करण्याची घिसडघाई असे त्याचे स्वरुप राहाते. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की सत्र न्यायालयांमध्येसुध्दा जिथे सरकारची बाजू टिकून राहू शकत नाही. तिथे सर्वोच्च न्यायालय, सरकार आपला युक्तीवाद कितपत यशस्वी करू शकेल याबद्दल शंका निर्माण होते. तेलतुंबडे यांना उच्च न्यायालयात अर्ज करण्याची संधीच दिली नाही आणि ते असा अर्ज करू शकतात असा अभिप्राय उच्च न्यायालयाने त्याबाबतीत व्यक्त केला होता. म्हणून न्यायालयांचा त्या आदेशाचाच अवमान पोलिसांकडून झाल्याचा दावा तेलतुंबडेंच्या वकिलांनी केला. न्यायाधिशांनी तो ग्राह्य धरला आणि त्यांची सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून माओवादाच्या नावाखाली जे काही अटकसत्र सुरु आहे त्याबद्दल देशभर चर्चा होताना दिसते. माओवाद हा देशासाठी उपयुक्त नाहीच. परंतु याचा अर्थ तो थेट देशविरोधी आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. कायदा आणि सुव्यवस्था पाळत असताना अशा प्रकारच्या हालचालींवर लक्ष ठेवले पाहिजे यातही काही शंका नाही. पण ही सुव्यवस्था ठेवत असताना पूर्वग्रह किंवा अर्धवट माहिती याचा आधार घेतला जातो मग हीच सुव्यवस्था कशी गैरव्यवस्था आहे हे न्यायालयांना ऐकावे लागते. डॉ. आनंद तेलतुंबडे चेन्नईचे आपले काम आटोपून पुण्याला विमानतळावर उतरले असताना तिथेच त्यांना अटक केली गेली. त्यांच्या प्रतिक्रियेनुसार अटकेच्या कार्यकाळात बऱ्याच शारीरिक आणि मानसिक यातना सहन कराव्या लागल्या. कायदा राबवताना तो सगळ्यांसाठी समान जरी असला तरी गुन्ह्याचे स्वरुप बघून वागणूक दिली जाणार असल्याची पोलिसांकडून अपेक्षा असते. तेलतुंबडे यांच्या अटक प्रकरणामध्ये याही गोष्टींवर प्रकाशझोत पडतो.

## सरकारच्या प्रतिष्ठेचा प्रश्न

आम्ही हे वारंवार यासाठी सांगतो आहोत की न्यायालयांकडून सरकारची वारंवार नाचक्की होणे म्हणजे सरकारच्या प्रतिष्ठेवरच भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होते. गेल्याच महिन्यात डान्सबार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने तडाखा दिला असतानाच लगेचच दोन दिवसांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अन्न नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांच्या कार्यपध्दतीवर ताशेरे ओढले होते. नियमबाह्य काम केलेल्या स्वस्त धान्य दुकानांबाबत कारवाई केली गेली. पण ती मंत्र्यांनी आपल्या अधिकारात मागे घेतली. ती अयोग्य असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले होते. त्याआधी अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा राज्यसरकारने घेतलेला निर्णय न्यायालयाने अयोग्य ठरवला होता म्हणजेच अशा प्रकारचे आदेश एकापाठोपाठ दिले गेले आहेत. जर सरकारकडून राबवल्या जाणाऱ्या कायद्यांबाबतच इतका हलगर्जीपणा असेल तर एकूणच राज्यातल्या सुव्यवस्थेविषयीसुध्दा प्रश्नचिन्ह निर्माण होते. निदान यानिमित्ताने तरी सरकारने कोणतेही निर्णय घेताना ते विचारपूर्वक घ्यावेत किंवा पोलिसांकडून केल्या जाणाऱ्या कारवायांचे परिणामही लक्षात घेतले गेले पाहिजेत. लोकांची न्यायालयांवर जास्त श्रध्दा आहे. अशावेळी स्वाभाविकपणे सरकारच्या कारभाराविषयीच लोकांच्या मनात अविश्वास निर्माण होतो. म्हणजेच सरकारकडून अनाठायी कारवाई होत आहे. किंवा चुकीचे निर्णय घेतले जात असल्याचे त्यातून आपोआपच स्पष्ट होते.